# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५९४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जावक क्र.मजीप्रा/रास/तांशा–1/350/ 1695
दिनांक : 10/6/1999

**//तांत्रिक परिपत्रक क्रमांक // १८**

विषय :– सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या रस्त्याच्या बाजूने जलवाहिन्या टाकताना घ्यावयाची खबरदारी.

सध्या मोठ्या प्रमाणावर पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर असून ब–याच ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वा इतर विभागाच्या मालकीच्या रस्त्यांच्या बाजूने जलवाहिन्या टाकाव्या लागत आहेत.

या अनुषंगाने सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की रस्त्याच्या कडेने पाईप लाईन टाकताना प्राधिकरणाच्या अधिका–यांकडून योग्य ती खबरदारी घेण्यात येत नाही. वस्तुतः रस्त्याच्या बाजूने लाईन टाकताना ती मुख्य रस्त्याच्या लगत असणा–या भरावा मधून (Road embankment ) टाकणे अपेक्षित नसून ती भरावाच्या पलीकडे टाकणे जरुरीचे आहे. अगदीच अपवादात्मक परिस्थितीमध्ये व संबंधित विभागाच्या पूर्व परवानगीने जलवाहिन्या रस्त्याच्या बाजूच्या भरावाखाली टाकल्यास आक्षेपार्ह ठरणार नाही पण सर्वच ठिकाणी जलवाहिन्या रस्त्याच्या बाजूच्या भरावाच्या खालून टाकणे योग्य नाही.

तसेच जलवाहिन्या टाकून पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या कडेचे भराव पूर्ववत करणे हे तर अत्यंत गरजेचे असते. मात्र याच ठिकाणी नेमके दुर्लक्ष होते व संबंधित विभागाच्या रोषास आपण कारणीभूत ठरतो.

उपरोक्त विवेचनाच्या अनुषंगाने आपणासर्वांना निर्देशित करण्यात येते की रस्त्याच्या कडेने पाईप लाईन टाकताना ती रस्त्यालगतच्या भरावामध्ये न टाकता भरावाच्या पलिकडे टाकण्यात यावी व यामध्ये कांही अडचणी असल्यास सार्वजनिक बांधकाम खात्याशी विचारविनिमय करुन त्यांच्या सल्ल्याने व रीतसर परवानगी घेऊन लाईन टाकण्यांत यावी.. याबाबत सर्व क्षेत्रिय अधिका–यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,
अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई यांचे माहितीसाठी सादर
सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांचे माहितीसाठी त्यांचे दि. 28/5/99 चे अ.शा.पत्र क्र.एमआयएस्सी–1099/सीआर121/आरडी.,1 माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा.
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. बांधकाम विभाग.